महाराष्ट्र शासन

# सुरक्षा लेखा परीक्षक मान्यता प्रमाणपत्र

## प्रमाणपत्र क्रमांक : मरा/औसुवआ/सुले/बी-००८/२०२१.

कळविण्यात येते की, **श्री. नितिन रमेश बावणकर**, प्लॉट नं. १६, ओम नगर, गिरड रोड, उमरेड, जि. नागपूर-४४१ २०३, यांना राज्य शासनाचे पत्र क्र. एफएसी-२०२१/प्र.क्र. ३३७/कामगार-४, दिनांक २७/१०/२०२१ अन्वये, सुरक्षा लेखा परिक्षण करण्यासाठी, महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षा) नियम, २०१४ नुसार, सुरक्षा लेखा परीक्षक म्हणून, मान्यता देण्यात येत आहे.

**हे प्रमाणपत्र दिनांक २९/१०/२०२१ ते दिनांक २८/१०/२०२३ पर्यंत ग्राहय राहील**

हे प्रमाणपत्र खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षा) नियम, २०१४ मधील तरतुदीं नुसार सुरक्षा लेखा परीक्षण करण्यात यावे.

२) सुरक्षा लेखा परीक्षण हे भारतीय मानक संहितेतील मानक १४४८९:१९९८ नुसार किंवा त्या त्या वेळी अधिभावी असलेल्या कोणत्याही मानकानुसार करण्यात यावे.

३) सुरक्षा लेखा परीक्षण करते वेळी सुरक्षा लेखा परीक्षक किंवा संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने व्यक्तिश: हजर रहावे व केलेल्या कामाची नोंद वही नियम ६(२)(ड)(एक) नुसार अद्ययावत ठेवावी.

४) सुरक्षा लेखा परीक्षकाने त्याचा प्रमाणपत्र क्रमांक व कालावधी सुरक्षा लेखा परीक्षण अहवालात नमूद करावा.

५) कोणतेही सुरक्षा लेखा परीक्षण प्राधिकृतीच्या विहित कालावधीनंतर करण्यात येऊ नये.

६) सदर प्रमाणपत्र कोणत्याही वेळी रद्द, निरस्त व सुधारणा करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे राहतील.

७) सुरक्षा लेखा परीक्षक किंवा संस्थेने प्राधिकृत केलेली व्यक्ती ज्या कारखान्यामध्ये नोकरी करीत असेल अथवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या, त्यांनी प्रचालन केलेल्या, व्यवस्थापन केलेल्या वा चालविलेल्या कोणत्याही कारखान्याचा भोगवटादार, भागीदार, संचालक किंवा व्यवस्थापक असेल, किंवा ज्या मध्ये लेखा परीक्षकाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षहित संबंध असेल, अशा कारखान्यांची सुरक्षा लेखा परीक्षा करणार नाही, ज्या कारखान्याच्या लेखापरीक्षकाने संयंत्र व यंत्र सामुग्री, कच्चा माल, सुरक्षेची साधने किंवा इतर माल, साधने पुरविलेली असेल, अशा कारखान्यांची सुरक्षालेखा परीक्षा करणार नाही.

८) सुरक्षालेखा परीक्षकाची, संस्थेची किंवा संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची मान्यता रद्द झाली तरीही, त्याने लेखा परीक्षक म्हणून आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या ओघात त्याला ज्ञात झालेली कोणतीही उत्पादन विषयक किंवा व्यावसायिक गुपिते किंवा उत्पादन प्रक्रिया किंवा इतर गोपनीय माहिती जाहीर करु नये. यात कसूर झाल्यास, तो त्या वेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार फौजदारी आणि दिवाणी कारवाईस पात्र होईल.

९) सुरक्षा लेखा परीक्षा प्रमाणपत्राचा नूतनीकरण अर्ज मान्यता कालावधी संपण्याच्या किमान तीन महिने अगोदर या संचालनालयास सादर करावा.

(सु.प्र. राठोड)
संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

क्र. औसुवआ/सूट/सुले/१२१/९१७५/१,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
कामगार भवन, ५ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२१.